# प्रेसनोट

नाशिक,
दि. १९ /०८/२०२३

**आलोसे भास्कर राणुजी जेजुरकर,लेखाधिकारी,आदिवासी विकास प्रकल्प नाशिक यांनी १०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | मुंबईनाका पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे गु.र.नं ३४६/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | **भास्कर राणुजी जेजुरकर,लेखाधिकारी,आदिवासी विकास प्रकल्प नाशिक** |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे मालकीचे शासकीय आश्रमशाळेकरीता भाडेतत्वावर दिलेल्या इमारतीचे माहे एप्रिल २०२३ ते जुन २०२३ पावेताचे एकुण ४,५९,२५८/- रू थकीत घरभाडे मिळणेकरीताची बिले पडताळणी करून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक यांचे कडे मंजुरी करीता सादर करणेसाठी आलोसे **भास्कर राणुजी जेजुरकर,लेखाधिकारी,आदिवासी विकास प्रकल्प नाशिक** यांनी तक्रारदार यांचे कडे १०,०००/- रु.लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे **भास्कर राणुजी जेजुरकर,लेखाधिकारी, आदिवासी विकास प्रकल्प नाशिक** यांनी तक्रारदार यांचे कडे १०,०००/- रु.लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि.१८.०८.२०२३ रोजी आदिवासी विकास भवान नाशिक,जवळील रमाई कॉम्पेक्स मधील अमृततुल्य चहाचे दुकानासमोर रस्त्यावर स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले असुन त्यांचेविरुध्द मुंबईनाका पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे गु.र.नं ३४६/२०२३ भ्र.प्र.का.सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे दि.१९.८.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे . |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :- | ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक |
| संकेतस्थळ | :- | acbmaharashtra.gov.in |
| ई-मेल | :- | spacbnashik@mahapolice.gov.in |
| ऑनलाईन तक्रार | :- | acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२५३-२५७५६२८, २५७८२३० |
| व्हॉट्स ॲपक्र | :- | ९९३०९९७७०० |

(नरेंद्र भा. पवार)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबधक विभाग, नाशिक